# पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई.

**2021**

गुन्हे शाखा, नवी मुंबई

दिनांक १०.०६.२०२१

## गुन्हे शाखेकडुन अपहरणाच्या गुन्हयातील पिडीत मुलीची केली सुटका

.......................................................................................................................

मा. पोलीस आयुक्त, श्री. बिपीन कुमार सिंह व मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. बी. जी. शेखर पाटील यांनी अपहरण झालेल्या अल्पवयीन मुला/ मुलींच्या गुन्हयांचा संवेदनशिलपणे तपास करून तातडीने शोध घेण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत.

मा.अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री.बी.जी. शेखर पाटील, मा. पोलीस उप आयुक्त, श्री. प्रवीणकुमार पाटील, मा. सहा. पोलीस आयुक्त, श्री. विनोद चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली गेले ०५ महिण्यापासुन प्रलंबित असलेल्या गुन्हयाचा गुप्त बातमीदार तसेच तांत्रिक माहितीव्दारे कौशल्याने तपास करून, ठावठिकाणा घेवुन अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाकडील वपोनि/पराग सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस अंमलदार यांच्या पथकाने कोरोना सारख्या महामारीच्या काळात सतत ०२ दिवस न कंटाळता रात्रंदिवस तपास करून खालील गुन्हयातील अपहृत मुलीचा शोध घेवुन गुन्हा उघडकीस आनलेला आहे.

**रबाळे एमआयडीसी पोलीस ठाणे गु.र.क ३४/२०२१ कलम ३६३ भादवि :-**

अपहृत मुलगी हिचेबाबत गुप्त बातमीदारा मार्फत तसेच तिच्याकडील मोबाईलचा तांत्रिक तपास केला असता अपहृत मुलगी हि कुरूडवाडी रेल्वे स्टेशन जवळ सोलापुर येथे असल्याची माहिती मिळाल्याने नमुद ठिकाणी शोध घेतला असता ती सदर ठिकाणी मिळुन आली आहे.

अशाप्रकारे एएचटीयु कक्षाने कुरूडवाडी रेल्वे स्टेशन जवळ सोलापुर या ठिकाणी जावुन अपहरणाचा **गुन्हा उघडकीस आणलेला आहे.** सदरचा गुन्हा वपोनिरी/पराग सोनवणे, पोना२८३८/गोरक्षनाथ पवार, पोना २१०८/विजय चौधरी, पोना २६५४/महेंद्र ठाकुर, मपोना २५०१/सविता म्हात्रे, यांनी उघडकीस आणलेला आहे.

- ----------